## सोलापूर महानगरपालिका

जा.क्र.सआस/कक्ष-१/आस्था-२/९४३७
सामान्य प्रशासन विभाग,
सोलापूर दि.१७/१२/२०१८

**-: जाहिरात :-**

**WALK - IN- INTERVIEW**

**दि.२४ /१२ /२०१८, वेळ दुपारी ०२.०० वाजतां**

**( अर्ज स्विकारण्याची वेळ :- सकाळी १०.०० ते १२.००)**

**स्थळ :- सोलापूर महानगरपालिका, इंद्रभुवन, सोलापूर.**

सोलापूर महानगरपालिकेच्या उद्यान विभाग अंतर्गत प्राणी संग्रहालयाकरीता प्राणी संग्रहालय संचालक या पदी तात्पुरत्या स्वरुपात **अकरा महिन्याच्या** कालावधी करीता खालील शैक्षणिक पात्रताधारण करणा-या पात्र उमेदवारांकडून Walk - in-Interview व्दारे करार पध्दतीने खालील शर्ती व अटीवर भरण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद संख्या | शैक्षणिक पात्रता | एकवट वेतन |
|---|---|---|---|---|
| १ | प्राणी संग्रहालय संचालक | १ (एक) | • मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्युत्तर पदवी एम.व्ही.एस.सी.<br>• अनुभव : प्राणी संग्राहलयाशी संबंधीत कामाचा २ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. | एकवट मानधन रुपये ३५,०००/- प्रति माह यावर अकरा महिन्याच्या कालावधी करिता नियुक्ती राहील. अकरा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल. |

**शर्ती व अटी :-**

१) वयोमर्यादा :- दि.०१/१२/२०१८ रोजी खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षापेक्षा जास्त असू नये. मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४३ वर्षापेक्षा जास्त असू नये. उच्च व जादा शैक्षणिक पात्रता धारण करणा-या उमेदवारांसाठी वयाची अट शिथिल करण्याचा अधिकार मा.आयुक्त यांचे कडे राहील.

२) मा.शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही - २०१०/प्र.क्र.१७/२०००/१२ दि.१ जुलै २००५ नुसार कुंटुंबांची अट लागू असून त्यानुसार दि.२८ मार्च २००५ नंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असू नये. सदर नियमाचे प्रतिज्ञा पत्र नमुना 'अ' नुसार उमेदवारांने सादर करावयाचे आहे.

३) आपली नियुक्ती ही एकवट मानधनावर असून पुर्णवेळ काम करण्याच्या अटीवर राहिल. अकरा महिन्या नंतर सदरची नियुक्ती आपोआप व्यपगत होईल यांची नोंद घ्यावी.

४) संबंधीत उमेदवारांचे चारित्र्य पडताळणी पोलीस यंत्रणेमार्फत करून घेण्यात येईल.

५) इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी त्यांच्या संपूर्ण परिचयपत्र, सर्व आवश्यक कागदपत्रांच्या एक सांक्षाकिंत प्रती, पासपोर्ट साईज फोटो व मुळ कागदपत्रे व त्यांच्या छायांकित प्रतीसह वरील तारखेस दिलेल्या वेळेत उपस्थित रहावे.

६) उमेदवारांनी मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित राहणेचे आहे.

७) स्थानिक परिस्थितीनुसार शर्ती व अटी शिथिल करणेबाबतचे अधिकारी मा.आयुक्त यांच्याकडे राहील.

८) कोणतेही कारण न देता निवड प्रक्रिया स्थगित ठेवण्याचे/रद्द करण्याचे अधिकार मा.आयुक्त यांना राहतील.

९) नियुक्तीसाठी कसल्याही प्रकारचा दबाव/गैरमार्गाचा अवलंब केल्यास उमेदवारी कोणत्याही टप्पावर कसलीही कल्पना न देता रद्द करण्यात येईल व त्याबद्दल कसलीही तक्रार करता येणार नाही.

१०) सदरची नियुक्ती ही केवळ ठराविक कालावधी करीता व नमूद एकवट मानधनावर करार पध्दतीने असल्याने नियुक्ती पूर्वी रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असलेबाबतचे करार पत्र करुन दयावे लागेल.

११) इच्छुक उमेदवारांनी सदर दिवशी सकाळी १० ते १२ या वेळेत अर्ज सादर करावा. कागदपत्राची पडताळणी करण्यासाठी सोबत मूळ कागदपत्रे आणावी.

7/3/12

**उपायुक्त,**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर.**